# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२१६५९२**

जावक क्रमांक : गों.वि./आस्था/६५७/२०१७ दिनांक :-१८.०२.२०१७

## परिपत्रक

**विषय : मा. राज्य माहिती आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत.**

संदर्भ : १) मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्र. रामाआ-२०१६/प्र.क्र. १८५-१६/आस्था-२, दि. २९/१२/२०१६

२) मा. कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, नागपूर यांचे परिपत्रक क्र. रामाआ २०१७/४(१) /प्र.क्र. (२६/२०१५)/आस्था, दि. ०८/०२/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. १ नुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५(१) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त झालेला राज्य माहिती आयोगाचा सन २०१५ चा दहावा वार्षिक अहवाल विधिमंडळास दिनांक १५/१२/२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे. सन २००६ ते २०१४ या कालावधीतील अहवालात आयोगाने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी झाली नसल्याचे अहवालात नमुद केले आहे.

संदर्भीय पत्र क्र . २ नुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याविषयी शासनाने तसेच आयोगाने वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. तथापी, त्याची योग्यरितीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कार्यवाही होत नसल्याचे द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलार्थीनी आयोगाच्या निदर्शनास आणुन दिलेले आहे.

त्याअनुषंगाने संलग्नित संदर्भीय पत्र क्र. १ व २ नुसार शिफारशीचे अनुपालन जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

( दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र - उपरोक्तप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

E:\LATTER\Circular/168/02

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२ २२८५५७६६

क्र : रामाआ-२०१६/प्र.क्र.१८५-१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २९.१२.२०१६

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 116 दि. 7/2/2017
जावक क्र. 254 दि. 7/2/2017

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 875 दि. 8/2/17
जावक क्र. 939 दि. 9/2/17

प्रति,

संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ). महाराष्ट्र राज्य,
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ शिक्षण /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विषय : राज्य माहिती आयोगाच्या सन २०१५ च्या दहावा वार्षिक अहवालाबाबत...

संदर्भ : सामान्य प्रशासन विभागाचे क्र.रामाआ-२०१६/प्र.क्र.१७८/सहा, दिनांक २१.१२.२०१६ रोजीचे पत्र.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 479 दि. 9.2.17
जावक क्र. ........ दि. ........

महोदय/महोदया,

सामान्य प्रशासन विभागाचे क्र.रामाआ-२०१६/प्र.क्र.१७८/सहा, दिनांक २१.१२.२०१६ रोजीचे पत्र सोबत जोडले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५(१) मधील तरतूदीनुसार राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त झालेला राज्य माहिती आयोगाचा सन २०१५ चा दहावा वार्षिक अहवाल विधिमंडळास दि.१५.१२.२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे. सन २००६ ते २०१४ या कालावधीतील अहवालात आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नसल्याचे अहवालात नमुद केले आहे.

तरी या शिफारशी आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील / सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतील सर्व जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार यथोचित कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

(रा.पि.जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Dr. Dube DR

Registrar
immediate

03/01/2017

C:\Users\shirish.padolya\Documents\क CR_१८५_२०१६.docx

## महाराष्ट्र शासन

**तातडीचे**
दूरध्वनी क्रमांक —०२२-२२०४९५४३

क्रमांक — रामाआ २०१६/प्र.क्र. १७८/सहा.
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः- २१.१२ .२०१६

22 DEC 2016

प्रति,

उप सचिव,
(माहिती अधिकार समन्वय),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय — राज्य माहिती आयोगाच्या सन २०१५ च्या दहावा वार्षिक अहवाल.

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २५(१) मधील तरतूदीनुसार राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त झालेला राज्य माहिती आयोगाचा सन २०१५ चा दहावा वार्षिक अहवाल विधिमंडळास दि.१५.१२.२०१६ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर अहवालाची पुस्तिका माहिती व सी.डी. आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

२. सन २००६ ते २०१४ या कालावधीतील अहवालात आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी झाली नसल्याचे विषयाधीन अहवालात नमूद केले आहे. या शिफारशी आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील/ सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतील सर्व जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी, यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार यथोचित कार्यवाही करून तत्संदर्भात विभागाचा एकत्रित अनुपालन अहवाल आयोगासह या विभागास पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(रा.गो.गायकवाड)
शासनाचे अवर सचिव.

सोबत-वरीलप्रमाणे

प्रत- कार्या-६ संग्रहार्थ.

## प्रकरण क्र. ५

## सार्वजनिक प्राधिकरणांकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास केलेल्या शिफारशी

५ यापूर्वीच्या वार्षिक अहवालातील ठळक शिफारशी खालीलप्रमाणे :-

**५.१ राज्य माहिती आयोगाच्या सन २००६ च्या अहवालातील शिफारशी-**

द्वितीय अपीलाची सुनावणी घेत असताना, राज्य माहिती आयुक्तांच्या निदर्शनास आलेल्या बाबींच्या आधारे राज्य माहिती आयोगाच्या, राज्य विधान मंडळास यापुर्वी सादर केलेल्या विविध वार्षिक अहवालांमध्ये (प्रकरण ५ मध्ये) शासनास शिफारशी केल्या आहेत.

**५.२ राज्य माहिती आयोगाच्या सन २००७ च्या अहवालातील शिफारशी-**

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कारणमिमांसा देऊन निर्णय देण्याबाबत सूचना निर्गमित करणे.
२) छायांकित प्रती व प्रमाणित प्रती देण्यासंदर्भात स्पष्टीकरणात्मक परिपत्रक काढणे.
३) प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे.
४) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्याकडील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती असणारी पुस्तिका प्रसिध्द करण्याबाबत सूचना देणे.
५) अभिलेख्यांची सूची करण्याबाबत निदेश देणे.
६) सार्वजनिक प्राधिकरणांकडील योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च, अर्थसंकल्पीय तरतूदी, प्रत्यक्ष खर्च याचा अहवाल कलम ४ अन्वये जनतेस सहजतेने उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन आदेश देणे.
७) राज्य सरकार तर्फे निधीव्दारे ज्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणावर वित्त पुरवठा केला जातो अशा अशासकीय संस्थांची यादी प्रसिध्द करणे.
८) कलम २७ प्रमाणे नियम प्रसिध्द करणे.
९) तक्रार निर्णयाबाबत नियम तयार करणे.
१०) आयोगाच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देणे.

**५.३ राज्य माहिती आयोगाच्या सन २००८ च्या अहवालातील शिफारशी -**

१) अभिलेखे सूचीबध्द करणे व संगणकीकरण करण्यायोग्य अभिलेख्यांचे संगणकीकरण करणे.
२) नियमांची मानके कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत.
३) अधिनियमाच्या कलम २ (ञ) प्रमाणे कोणती माहिती मागता येते व कोणती माहिती मागता येत नाही याचे विश्लेषण प्रसिध्द करणे.
४) माहिती मिळण्याकरता प्रसिध्द केलेले अतिरिक्त नियम, मार्गदर्शक तत्त्वे प्रसिध्द करणे.
५) आयोगाच्या आदेशाचा अवमान झाल्यास शास्ती होऊ शकते याची स्पष्ट कल्पना देणारे परिपत्रक काढणे.
६) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे.
७) प्रथम अपीलावरील निर्णय देताना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावरील निर्णयात माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत विश्लेषण करण्याचे शासन स्तरावरुन आदेश देण्याबाबत.

**५.४ राज्य माहिती आयोगाच्या सन २००९ च्या अहवालातील शिफारशी -**

१) कलम ४ ची अंमलबजावणी गंभीरपणे करणे.
२) कलम १९ (१) अन्वये केलेल्या प्रथम अपीलावर कशा प्रकारे निर्णय घ्यावा याबाबत शासनस्तरावर परिपत्रक काढणे.
३) वन हक्क व जल स्वराज्य समितीकडील योजनांशी संबंधित माहिती देण्यासाठी ग्राम सेवकांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करणे.
४) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतूदींचे पालन करण्याबाबत.
५) प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून किमान नायब तहसिलदार दर्जाचे अधिकारी नेमण्याबाबत.

६) दारिद्र्य रेषेखालील अर्जदारांना जास्तीत जास्त ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य देण्याबाबत.

७) अनुदानित शाळांतील मुख्याध्यापकांना माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्याचे निदेश देण्याबाबत.

**५.५ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१० च्या अहवालातील शिफारशी -**

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली द्वितीय अपिले निकाली काढण्यासाठी कार्यपध्दती विहित करणे.

२) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१) (ख) प्रमाणे आणि महाराष्ट्र राज्य शासनाचे परिपत्रक क्रमांक केंमाअ २००८/८७०/प्र.क्र.३००/सहा, दिनांक १३/५/२००९ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणांनी करावयाच्या पत्रव्यवहारावर जन माहिती अधिकाऱ्याचा तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा पूर्ण पत्ता (नावासहित), पदनाम, दूरध्वनी क्रमांक, ई मेल आय.डी. इत्यादी बाबी नमूद करण्याबाबत पुन्हा निदर्शनास आणणे.

३) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) नुसार ३० दिवसांच्या आत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर कलम ७ (६) नुसार अर्जदाराने मागितलेली माहिती मोफत पुरविण्यासंदर्भात कागदपत्रांच्या छायाप्रतींसाठी येणारा खर्च संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेणे.

४) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) किंवा १९ (२) अन्वये प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने अपील मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निकाली न काढल्यास कलम १९ (६) प्रमाणे विलंबाने प्रकरण निकाली काढताना झालेल्या उशिराबाबतची कारणे नमूद करणे, अन्यथा प्रशासकीय कारवाई करणे.

५) अर्जदाराने माहिती प्राप्त करण्यासाठी भरलेली रक्कम त्याच कामासाठी कशी वापरता येईल व ती वापरण्यासाठी कोणती कार्यपध्दती कार्यान्वित करता येईल, याचा शासन स्तरावर विचार करणे.

६) माहितीच्या अधिकारात अर्जदाराने साक्षांकित अनेक प्रतींची मागणी केल्यास माहिती शुल्काचे दर नव्याने निश्चित करावेत जेणेकरून साक्षांकित प्रतींच्या मोबदल्यात शासनास महसूल उपलब्ध होऊ शकेल.

७) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत शासनाचे निर्णय तसेच परिपत्रके ग्राम पातळीपर्यंत पोहोचतील याची खात्री करणे.

**५.६ राज्य माहिती आयोगाच्या सन २०११ च्या अहवालातील शिफारशी -**

१) कलम ४ ची अंमलबजावणी गांभीर्याने करणे.

२) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेख सूचिबध्द करणे व संगणकीकरण करणे.

३) आयोगाच्या आदेशांचे अनुपालन विहीत मुदतीत करणे.

४) दारिद्य रेषेखालील अर्जदारांना किती पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य पुरवावी याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेण्याची आवश्यकता.

५) योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक करण्याबाबत शासन आदेश काढणे.

६) प्रथम अपिलावर विहीत मुदतीत निर्णय घेणे.

**५.७ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१२ च्या अहवालातील शिफारशी :-**

१) शासकीय कामकाजामध्ये सुधारणा व कामाकाजाची माहिती होण्यासाठी सर्व कर्मचा-यांच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (Departmental Qualification Examination) घेण्यात येतात. या परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये :

- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
- महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख, २००५
- महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३

या विषयांचा समावेश करावा. (कलम २७ (२)(च) नुसार समुचित शासनाला अधिकार)

२) नागरिकाने माहितीचा अर्ज केल्यास व त्याला माहिती ई-मेल वर हवी असल्यास माहितीच्या प्रती स्कॅन करुन माहिती ई-मेल वर देण्याची तरतूद नियमात करण्यात यावी.

- त्यामुळे वेळ व पैसा वाचेल
- कार्यालये ई-गव्हर्नन्सचा वापर करण्यास सुरुवात करतील
- सद्या बहुतेक कार्यालयात माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती पाठविण्यासाठी पोस्टेजला निधी उपलब्ध नसतो.

- नागरिकाने भरलेले शुल्क लेखाशीर्षावर जमा होते ते काढता येत नाही.
- त्यामुळे माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रीयेत अनेक अडचणी जन माहिती अधिका-यांपुढे असतात.
- केवळ सहजपणे स्कॅन करणे शक्य असलेले, तसेच संगणकावर उपलब्ध असणारी माहिती अशी ई-मेलवर मोफत देण्याची सुरुवात केल्यास माहिती प्रकट करण्याच्या प्रक्रीयेलाही वेग येईल व कार्यालयावरचा ताणही कमी होईल.

३) सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतील प्रथम अपिलीय प्राधिका-यांवर प्रथम अपिलाची सुनावणी योग्य पध्दतीने घेण्याचे बंधन घालून त्यांना सुनावणीची पध्दत, सुनावणीसाठी द्यावयाची सुस्पष्ट नोटीस, सुस्पष्ट आदेश व आदेशाची प्रत नागरिकांस तात्काळ देण्याची पध्दत इ. बाबतीत नियम करुन प्रशिक्षणाची सक्ती करणे.

४) सर्व प्राधिकरण प्रमुखांना म्हणजेच खाते प्रमुखांना खालील बाबींसाठी जबाबदार ठरवणे व या बाबी त्यांचे वार्षिक गोपनिय अहवाल तसेच Annual Performance Report शी निगडीत करणे.

५) माहितीच्या अधिकार अधिनियमातील कलम ४ची अंमलबजावणी

६) महाराष्ट शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ चे प्रकरण ३ ची (नागरिकांची सनद) अंमलबजावणी.

७) सर्व अधिकारी/कर्मचा-यांचे वरील दोन अधिनियम व अभिलेख व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

८) प्रत्येक कार्यालयात अभिलेख कक्ष उभारणे व अभिलेखापाल नेमला नसेल तिथे अभिलेखापाल पदनिर्देशित करण्यास सक्ती करणे.

९) वरील तीनही अधिनियमांची अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर विभाग प्रमुख, खाते प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचा क्रीयाशील सहभाग असणे आवश्यक आहे.

१०) अभिलेख व्यवस्थापनाविषयी सर्व कार्यालये व कर्मचा-यांमध्ये अनास्था दिसून येते. त्यामुळे माहिती देताना व तिचा शोध घेताना अडचणी निर्माण होऊन कर्मचा-यांचा वेळ व श्रम माहिती शोधण्यात जातो. हे टाळण्यासाठी प्रत्येक कार्यालयाच्या अभिलेखाची तपासणी (Audit) अभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत करण्यास सक्ती करण्यात यावी.

११) माहितीच्या अर्ज व अपिलांबाबत कार्यालयात स्वतंत्र टपाल व्यवस्था करण्याचे सुचविणे

१२) कलम-४च्या अंमलबजावणीसाठी सर्व कार्यालय प्रमुखांना कलम-४ चे प्रशिक्षण अनिवार्य करावे. सदरचे प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केल्याचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यास सक्ती करावी.

१३) कार्यालयास अथवा विभागास माहिती अधिकार अर्जांचे, अपिलांचे व तक्रारींचे प्रमाण जास्त असेल तिथल्या कार्यालयाचे कलम-४ चे त्यांच्या प्रचार व प्रसाराबाबतची तपासणी (Audit) यंत्रणेमार्फत करुन त्याचा अहवाल राज्य माहिती आयोगास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी. (कलम-१९ (८)(क)(६) नुसार) माहितीच्या अर्ज व अपिलांबाबत कार्यालयात स्वतंत्र टपाल व्यवस्था करण्याचे सुचविले.

१४) ब-याचशा सार्वजनिक प्राधिकरणांनी अतिशय कनिष्ठ स्तरावरच्या अधिका-यांना व कर्मचा-यांना जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी नेमलेले असल्याने ज्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद वरिष्ठांकडून त्यांना मिळत नाही. यास्तव, जेष्ठता असलेल्या अधिका-यांना जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नेमणे योग्य राहील.

१५) जन माहिती अधिका-यांचे पद निर्देशन करताना, कार्यालयातील सर्वसाधारणपणे कामाचा पुरेसा अनुभव व दर्जा असणा-या अधिका-यालाच जन माहिती अधिकारी करणे आवश्यक आहे असे निदर्शनास येते की, वरिष्ठ अधिकारी ही जबाबदारी कनिष्ठातले कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांच्यावर ढकलून स्वत: नामानिराळे राहाण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

## ५.८ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१३ च्या अहवालातील शिफारशी :-

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-७ (५) अन्वये दारिद्य रेषेखालोल व्यक्तींकडून कोणतीही फी आकारण्यात येत नाही. मात्र, आता या प्रकरणांमध्ये बऱ्याचशा सार्वजनिक प्राधिकरणांना अनेक अडचणी येत आहेत. यास्तव, यापूर्वी जे अर्जदार दारिद्य रेषेखाली येत आहेत त्यांना ५० पृष्ठांपर्यंत मोफत माहिती देण्यात यावी व त्यानंतर त्यांचेकडून विहित शुल्क आकारण्यात यावे, अशी शिफारस करण्यात आली होती. या शिफारशींचा पुनरुच्चार करण्यात येत असून शासनाने याबाबत कलम-२७ नुसार आदेश निर्गमित करावेत, अशा सूचना करण्यात येत आहेत.

२) ज्या प्रकरणामध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी आयोगाचे आदेशानुसार शास्तीची वसुली केलेली नाही किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरु केलेली नाही अशा सार्वजनिक प्राधिकरणांविरुध्द योग्य ती कारवाई शासनाने करावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

३) नागरिकांनी भरलेले शुल्क लेखाशिर्षाखाली जमा होते व ते काढता येत नसल्याने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांना मात्र समस्यांना तोंड द्यावे लागते. यावर उपाय म्हणून जिल्हा अधिकारी यांचे स्तरावर एक पी. एल. ए. अकाऊंट उघडून संपूर्ण जिल्ह्यातील जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अर्जदारांकडून जमा होणारी रक्कम या पी. एल. ए. अकाऊंटमध्ये जमा करावी व यातून जिल्हा अधिकारी यांनी काही विशिष्ट प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना निधी वाटप करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

४) ज्या प्रकरणांमध्ये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम-४(१) (क) व (ख) चे पालन केलेले नाही त्या संबंधित विभागांच्या सचिवांना जबाबदार धरण्यात यावे.

५) अलिकडेच महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणावर माहिती अधिकार अधिनियमाचे काम करीत असलेल्या कार्यकर्त्यांवर हल्ले झाले असून काहींचे खून देखील करण्यात आलेले आहेत, ही बाब अतिशय गंभीर असून आयोगाने शासनाला (मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन) (पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य) अशा प्रकरणात त्वरीत कार्यवाही करण्याचे व प्रत्येक प्रकरणातील गुणवत्तेनुसार कार्यकर्त्यांना पोलिस संरक्षण देण्याबाबत गांभिर्याने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६) ज्या सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात माहिती अधिकार अधिनियमाचे अर्ज येतात त्यांच्याबाबत विशेष अधिकारी, कर्मचारी वर्ग नेमून त्यांना योग्य ती साधनसामग्री व कार्यालयीन खर्चाकरिता आकस्मिकता निधी (Contingency Fund) देण्यात यावा.

७) आयोगामध्ये १३६ एवढी पदे असून त्यापैकी ४४ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्यासाठी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असला तरी अद्यापि पुरेसा कर्मचारी वर्ग दिलेला नाही. शासनाने रिक्त पदे त्वरीत भरावी तसेच माहिती आयुक्तांचे एक पद रिक्त आहे ते त्वरीत भरावे.

### ५.९ राज्य माहिती आयोगाच्या सन २०१४ च्या अहवालातील शिफारशी :-

सन २००६ पासून २०१३ पर्यंतच्या वार्षिक अहवालांत सुमारे ६० शिफारशी आयोगाने केल्या असून या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत फारशी प्रगती शासनाकडून झालेली नाही. यास्तव, या अहवालात आणखी शिफारशी करण्याची आवश्यकता नाही. आयोग अशी अपेक्षा करीत आहे की, वरील सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येईल.

### ५.१० राज्य माहिती आयोगाच्या सन २०१५ च्या अहवालातील शिफारशी :-

मागील वर्षाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे चालू वर्षाच्या अहवालात देखील नविन शिफारशी करण्याची आवश्यकता नाही. आयोग अशी अपेक्षा करीत आहे की, वरील सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही शासनाकडून तातडीने करण्यात येईल.

*-*-*-*-*-*-*-*-*

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 424 दि. 15/2/17
जावक क्र. 1008 दि. 15/2/17

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६६८१६

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**

**परिपत्रक क्रमांक : रामाआ २०१७/४(१)/प्र.क्र.(२६/२०१५)/आस्था**

प्रशासकिय इमारत क्र. २, १ला मजला, सिव्हील लाईन्स,
नागपूर - ४४०००१

**दि. : ०८ फेब्रुवारी , २०१७**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 510 दि. 15-2-17
जावक क्र. ........ दि. ........

## परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याविषयी शासनाने तसेच आयोगाने वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमीत केल्या आहेत. तथापि, त्याची योग्यरितीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कार्यवाही होत नसल्याचे द्वितीय अपीलाच्या सुनावणी मध्ये अपिलार्थींनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सुचित करण्यात येत आहे.

१. माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदींनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील (जोडपत्र ब) सादर केल्यानंतर त्यावर ३० दिवसाचे आत सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक आहे. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी हे प्रथम अपीलावरील सुनावणी आयोजित करून त्यादिवशी स्वतः अनुपस्थित राहतात अथवा अन्य कारणांमुळे सुनावणी घेत नसल्याचे अपिलार्थींनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या अशा कृतीमुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाल्यास विलंब, वेळेचा अपव्यय आणि आर्थिक झळ सोसावी लागते. सुनावणीसाठी संबंधितांना वेळ व दिवस कळवून त्या दिवशी अपीलीय अणिकाऱ्यांनी स्वतःच अनुपस्थित राहणे अनुचित व नियमांचे गांभीर्य नसल्याचे दर्शविते आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियोजित वेळेत सुनावणी घेतल्यास, अपिलार्थीस माहिती मिळून त्यांचे समाधान झाल्यास त्यांना आयोगात द्वितीय अपील सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. या बाबी विचारात घेऊन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियोजित वेळेतच सुनावणी घेऊन

संबंधितांना सूचना द्यावी
Dr. Dube DR
श्री. नरोटे AR / श्री. बोबडे
कार्यवाहीस्तव
15/2/17

त्याचे निर्णय निर्गमित केल्या जातील, याची दक्षता घ्यावी. कार्यालयीन कामकाजात व्यस्त असल्याने प्रथम अपीलाच्या सुनावणीस ठरविलेल्या दिवशी उपस्थित राहता आले नाही, असा खुलासा समर्थनीय नाही. प्रथम अपील घेणे हा सुध्दा कामकाजाचा भाग आहे. त्याला दुय्यम महत्व देणे जास्तच गंभीर आहे. नियोजित काम जास्त असले तरी सर्व प्रथम अपीलाच्या सुनावण्या एकाच दिवशी ठरवून अपीलीय अधिकाऱ्यांनी त्यावेळी कसल्याही सबबी पुढे न करता उपस्थित राहावे.

२. बरेचदा प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित नसल्याचे कारण नमूद करून प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात येत नाही किंवा त्याचे आदेश पारित करण्यात येत नाही. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदींशी सुसंगत नाही. सबब, अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित असला तरी प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावरील आदेश निर्गमीत करणे आवश्यक आहे.

३. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतल्यानंतर लेखी आदेश निर्गमीत केल्या जात नाही. त्यामुळे अपिलकर्त्यास संबंधित प्रथम अपिलीय आदेशात झालेल्या निर्णयाची किंवा प्रथम अपिलीय अधिकारी यांची भूमिका लक्षात येत नाही.. त्यामुळे त्यांना द्वितीय अपील करावे लागते. अपिलार्थी यांना प्रथम अपिलात वेळ काढून उपस्थित राहावे लागते. त्याउपर निर्णय न झाल्याने प्रकरणात कालापव्यय होते त्यामुळे अशा प्रकरणात प्रथम अपीला मध्ये झालेली पूर्ण कार्यवाही निष्फळ ठरते. सदर कार्यवाही कायद्याच्या अधिनियमातील तरतूदींच्या विसंगत आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी यांची बाजू तसेच उपलब्ध कागदपत्रे जोडपत्र 'अ' व 'ब' चा सखोल अभ्यास करून लेखी आदेश पारीत करणे आवश्यक आहे.

४. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक रामाआ २०१६/प्र.क्र.(१७८/१६)/६ दिनांक ०१.०२.२०१७ च्या परिच्छेद २(४) मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित कार्यालयातील कामाचा पुरेसा अनुभव व दर्जा असणाऱ्या योग्य वरिष्ठतेच्या अधिकाऱ्यांची जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत पत्रव्यवहार करतांना सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव, पदनाम तसेच विभागाचे नाव ठळकपणे नमूद करावे.

वरीलप्रमाणे बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

सदर परिपत्रक मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

( हि. या. दुफारे )
कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, नागपूर

**प्रति,**

१. पोलीस आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
२. जिल्हाधिकारी, नागपूर/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया
३. पोलीस अधिक्षक, नागपूर/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया
५. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर/ चंद्रपूर
६. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
७. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर
८. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
९. उपसंचालक, शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
१०. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर
११. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर
१२. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर
१३. मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१४. जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, नागपूर
१५. नगर भूमापन अधिकारी, नगर भूमापन क्र. १, २ व ३.
१६. निवड नस्ती.

जावक क्र. ९३४
दि. 9 FEB 2017